**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ५**

**नि.फौ.ख.क्र. २१/२०२३**

महाराष्ट्र शासन वि. देविदास व इतर

**नि.क्र. ४४**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – सुरेंद्र रामचंद्र बालपांडे,

वय – ३६ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–**

आमची शेती भायवाडी, ता. नरखेड, जि. नागपुर येथे १.०९ हे.आर. आहे. आमच्या शेतीच्या उत्तर बाजुला आरोपी क्र. १ देविदास ची शेती आहे. दि. ०७/१२/२०२२ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास मी, माझे वडील, माझा भाउ रविंद्र आणि एक मजुर नामे लक्ष्मीबाई कोहळे आमच्या शेतात कामानिमीत्त गेलो. त्याच दिवशी ०२:०० वाजताच्या सुमारास माझा भाउ नामे राजेंद्र आणि माझी आई चंद्रकला शेतात आले. आरोपी क्र. १ ते ४ दुपारी ०२:३० च्या दरम्यान आले आणि भांडण करायचे प्रयत्न केले. त्यांनी मारहाणीचे सुध्दा प्रयत्न केले. आरोपी क्र. १ ने आमच्या शेतातील पराटी कापली होती. आरोपी क्र. देविदास ने माझ्या आईला अश्लील शब्दात शिवीगाळ केली आणि म्हणाला की ''तुझ्या मायच्या पुदीत चोमनं. इथच मर्डर करुन गाडुन टाकीन.'' पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयान नोंदविले होते. सदर घटना भायवाडी येथील आमच्या शेताच्या धु–यावर

लागुन असलेल्या रस्त्यावर घडली. मी आरोपी क्र. १ ते ४ यांना बघितल्यावर ओळखु शकतो. ते आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ची आई श्रीमती. कमला शंकर राकेश आहे. हे म्हणणे खरे आहे की, कमला शंकर राकेश यांनी माझ्या दोन्ही सख्या भावां विरुध्द नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०२१, दिवाणी न्यायालय, नरखेड येथे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दोन्ही भावांनी गणपती उर्फ गणपतराव नासरे याच्याकडुन बेकायदेशीर रित्या शेती विकत घेतली. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७/१२/२०२२ पुर्वीपासुन माझे आणि आरोपी क्र. १ ते ४ व त्यांची आई यांच्यासोबत वाद आहे. हे मला आठवत नाही की कमला शंकर राकेश यांनी माझे व माझ्या पुर्ण कुटुंबा विरुध्द पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कमला शंकर राकेश यांनी माझे व माझ्या कुटुंबा विरुध्द अपराध क्र. ४०३/२०२२, पोलीस स्टेशन नरखेड येथे नोंदविले. हे मला माहित नाही की, कमला शंकर राकेश यांनी तथाकथित घटने अगोदर माझे व माझ्या कुटुंबा विरुध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे तक्रार दिली होती किंवा नाही.

**३.** माझे भाउ राजेंद्र आणि रविंद्र हे गणपती उर्फ गणपतराव नासरे यांच्याकडून विकत घेतलेली शेती वाहत आहे. मी पोलीसांना बयान देतांना सांगितले होते की, आरोपी क्र. १ ते ४ नी भांडण करायचे व मारायचे प्रयत्न केले. मी पोलीसांना बयान देतांना हे हीं सांगितले होते की, आरोपी क्र. १ ने आमच्या शेतातील पराटी कापली. मी पोलीसांना बयान देतांना सांगितले होते की, सदर घटना भायवाडी येथील आमच्या शेताच्या धु–यावर लागुन असलेल्या रस्त्यावर घडली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेती व घराबद्दल

पुर्वीपासुन वाद असल्यामुळे आरोपी विरुध्द माझ्या भावाच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताच्या अवती भोवती इतर लोकांची सुध्दा शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शेताच्या अवती भोवती असलेल्या शेतीमध्ये लोकं काम करतात.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष,

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.27 16:27:42 -0500

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.27 16:27:47 -0500

(रोहन विजयकुमार थाईल)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड, नागपूर.

दिनांकः २७/०१/२०२६.

दिनांकः २७/०१/२०२६

माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 03 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे व **Explanation V**, **Paragraph No**. 16, **Chapter VI of Criminal Manual** प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.

साक्षीदाराची सही
(सुरेंद्र रामचंद्र बालपांडे)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(व्ही. यु. मिरचे)